# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरवनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे— ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/ २१०१

दिनांक : १६/०६/२०१७

**महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे—०७.

विषय : महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन प्रवेशासाठी विकसित करण्यात आलेल्या संगणक प्रणालीसाठी विद्यार्थ्यांकडून शुल्क न आकरण्याबाबत....

संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र. ६४/२०१६ व पत्र क्र. शै.प्रवेश/४६७९ दि.०५/१२/२०१६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सुचनेनुसार सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होणेबाबत विद्यापीठाने परिपत्रक क्र. ६४/२०१६ दि. २३/०३/२०१६ अन्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

यासंदर्भात, शासनस्तरावर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाकरिता सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑनलाईन करणे व अंतर्गत कामकाजाकरिता सर्व समावेशक ''एकसंघ संगणक प्रणाली पध्दती'' उपलब्ध करून देण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याने महाविद्यालयाने नव्याने संगणक प्रणाली विकसित करू नये अशा सूचना शासनाने दि. २२/११/२०१६ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. तथापी, काही महाविद्यालयामार्फत आपल्या स्तरावर स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करून ऑनलाईन पध्दतीने प्रवेशांची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी प्रवेश अर्जाच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून रू. ५०० ते १००० आकारले जात असल्याबाबतच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त झालेल्या आहेत.

वरील विषयासंदर्भात सर्व संलग्नित महाविद्यालयांना पुनश्च: सुचित करण्यात येते की, शासन स्तरावर ''एकसंघ संगणक प्रणाली पध्दती'' उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार असून महाविद्यालय स्तरांवर नव्याने कोणतेही संगणक प्रणाली विकसित करून यासाठी विद्यार्थ्यांकडून शुल्काची आकारणी करण्यात येऊ नये. तसेच ज्या महाविद्यालयात ऑनलाईन पध्दतीने प्रवेशाची कार्यवाही करण्यात येत आहे, अशा महाविद्यालयांनेही ऑनलाईन अर्जासाठी शुल्काची आकरणी करू नये. यांची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला

16/6/2017

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहितीकरीता
मा. संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे—१.
मा. कुलगुरू, यांचे कार्यकारी सहायक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे —७
मा. कुलसचिव, यांचे स्वीय सहायक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे —७